महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कार्यकारी संपादक : श्री. विजय यादव | jeevandeepvartanews2020@gmail.com | मुख्य संपादक : श्री. रविंद्र घोडविंदे | Rs.2/-

मंगळवार ❖ ०१ ऑक्टोबर २०२४ ❖ वर्ष ६ ❖ अंक ०९८ ❖ पाने - ४

RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मध्ये कंपनी, मिळकत, जमीन- जुमला, सहकारी संस्थांच्या नोटीस तसेच बक्षीसपत्र, घटस्फोट, पोटगी, नावात बदल आदी कायदेविषयक छोट्या जाहिरातीना केवळ ५००/- रुपयांत प्रसिद्धी दिली जाईल; कोणत्याही शासकीय नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क साधा.

:: कार्यालय ::

९६१९१८८५५८ / ९१५८०७८६०१

E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com
news.thanejeevandeep@gmail.com

# राज्य सरकारकडून निर्णयांचा धमाका

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/ (वृत्तसेवा) -**

मुंबई : राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखालील राज्य मंत्रिमंडळाची आज महत्वाची बैठक पार पडली. या बैठकीमध्ये ३८ महत्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. २०२३ च्या खरीप हंगामातील कापूस आणि सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना अनुदान वितरणाचा शुभारंभ आज राज्य मंत्रिमंडळाच्या या बैठकीत करण्यात आला. पहिल्या टप्प्यात ४९ लाख ५० हजार खातेदारांच्या खात्यांमध्ये २३९८ कोटी ९३ लाख रुपये जमा करण्यात येत आहेत. तर या बैठकीमध्ये सरकारी कर्मचाऱ्यांना देखील खूश करण्यात आले आहे. सरकारी कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला अथवा कर्मचारी निवृत्त झाले अशा कर्मचाऱ्यांच्या निधीमध्ये वाढ करण्यात



## मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेतले ३८ महत्वाचे निर्णय

आली आहे. यामध्ये सेवानिवृत्ती उपदान १४ लाखांवरुन थेट २० लाख रुपये ऐवढा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.


**राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आलेले महत्वाचे निर्णय -**

१. कोतवालांच्या मानधनात १० टक्के वाढ. अनुकंपा धोरणही लागू. (महसूल विभाग) २. ग्राम रोजगार सेवकांना आता दरमहा ८ हजार रुपये मानधन तसेच प्रोत्साहन अनुदान (नियोजन विभाग) ३. ऑरेंज गेट ते मरीन ड्राईव्ह भुयारी मार्गाच्या कामाला गती देणार. एमएमआरडीए ला बिनव्याजी दुय्यम कर्ज सहाय्य देण्यास मान्यता. (नगर विकास विभाग) ४. ठाणे वर्तुळाकार मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या कामास गती देणार. १२ हजार २०० कोटींच्या सुधारित आराखड्यास मान्यता. (नगर विकास विभाग) ५. ठाणे ते बोरिवली भुयारी मार्गासाठी १५ हजार कोटी कर्जरूपाने उभारणार. (नगर विकास विभाग) ६. देशी गाईंच्या पालन पोषणासाठी अनुदान योजना. (पशुसंवर्धन विभाग) ७. भारतीय खेळ प्राधिकरणाला आकुर्डी, मालाड व वाढवण येथील जागा नॅशनल सेंटर ऑफ एक्सलन्स उभारणार. (क्रीडा विभाग) ८. रसायन तंत्रज्ञान संस्थेस ठाणे येथील मौजे खिडकाळीची जागा. (महसूल विभाग) ९. राज्य जलसंपत्ती माहिती केंद्र स्थापणार. जलस्त्रोतांचे उत्तम नियोजन करणार. (जलसंपदा विभाग) १०. जळगाव जिल्ह्यातल्या भागपुर उपसा सिंचन योजनेस सुधारित मान्यता. ३० हजार हेक्टर जमीन सिंचित होणार. (जलसंपदा विभाग) ११. लातूर जिल्ह्यातील हासाळा, उंबडगा, पेठ, कव्हा कोल्हापूर बंधाऱ्याच्या कामास मान्यता. (जलसंपदा विभाग)

१२. धुळयाच्या बीएपीएस स्वामीनारायण संस्थेस ग्रामस्थांच्या विकासासाठी जमीन. (महसूल विभाग) १३. रमाबाई आंबेडकर नगर, कामराजनगरच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेला गती देणार. एमएमआरडीए ला जमीन अधिमूल्य भरण्यास सवलत. (नगर विकास पान ४ वर ▶▶

# अंगणवाडी सेविकांच्या मानधनात ५०% वाढ





**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/ (प्रतिनिधी) -**

मुंबई : अंगणवाडी सेविकांसाठी आनंदाची बातमी समोर येत आहे. अंगणवाडी सेविकांच्या मानधनात वाढ करण्यात आल्याचा निर्णय आजच्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेतल्याची माहिती राज्याच्या महिला आणि बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली आहे. तर ज्या सेविकांनी लाडकी बहीण योजनेचे फॉर्म भरले त्यांना इन्सेंटिव्ह देखील मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

आदिती तटकरे म्हणाल्या की, आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत अंगणवाडी सेविकांच्या मानधन वाढीचा प्रस्ताव आम्ही ठेवला होता. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि इतर सर्व मंत्र्यांनी त्या प्रस्तावाला पाठिंबा दिला आहे. मानधनात साधारण ५० टक्के वाढ आम्ही केली आहे, असे त्यांनी म्हटले आहे.

**अंगणवाडी सेविकांच्या मानधनात वाढ**

ज्या महिला मदतनीस आहेत त्यांना ३ हजार अधिक मानधन देण्याचा निर्णय घेण्यात आला. तर अंगणवाडी सेविकांना दहा हजार रुपये मिळत होते. त्यात आता ५ हजार अधिक मिळणार आहेत. मागच्या वेळेस ३ हजार वाढवले होते. मात्र, आता पाच हजार वाढवण्यात आले आहेत, अशी माहिती आदिती तटकरे यांनी दिली आहे.

**इन्सेंटिव्ह देखील मिळणार**


त्या पुढे म्हणाल्या की, अतिशय परखडपणे अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांची मानधनात वाढ करण्यात आल्याने आम्हाला आनंद होत आहे. तर ज्या सेविकांनी लाडकी बहीण योजनेचे फॉर्म भरले त्यांना इन्सेंटिव्ह देखील आम्ही सुरू करत आहोत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आमची अग्रेसर मागणी पूर्ण केली आहे. पान ४ वर ▶▶

# कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीची सर्वसाधारण सभा संपन्न



कल्याण : कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीची सर्वसाधारण सभा शांततेत संपन्न कल्याण प्रमोद भानुषाली कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीचा व्यवहार पाहता शासकीय लेखा परीक्षण व वेळोवेळी शासनकीय अधिकाऱ्यांनी केलेल्या तपासणी मध्ये प्रशासकीय कारभार अधिनियमाला धरूनच होत असल्याचे शेरे पाहता खरंच आनंद होत आहे व आम्ही योग्यता वाटेनेच जात असल्याचे स्पष्ट मत सभापतींनी मांडले.कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीच्या साई नंद हॉलमध्ये झालेल्या या सभेसाठी अजित पवार राष्ट्रवादी गटाचे उपाध्यक्ष व समितीचे निर्माते प्रमोद हिंदुराव तसेच शिंदे गटाच्या शिवसेनेचे पदाधिकारी अरविंद मोरे समितीचे सर्व संचालक सर्व पक्षांचे नेते सोसायटीचे प्रतिनिधी व्यापारी शेतकरी ग्रामपंचायत सदस्य हमाल माथाडी माथाडी तसेच प्रशासकीय अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांचे स्वागतही करण्यात आले शिवाय दिवंगत झालेल्या महानुभवांना श्रद्धांजली ही अर्पण करण्यात आली त्यानंतर सभापतींनी आपले मनोगत व्यक्त केले सभापतींनी समितीकडे कर्ज नसल्याचा दावा करताना बहुतेक प्रकल्प पूर्ण झाल्याची ग्वाही दिली उत्पन्न वाढीसाठी केलेल्या प्रयत्नातून ११९ पान ४ वर ▶▶

# ठाण्याच्या विकासासाठी बूस्टर डोस



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/ (प्रतिनिधी) -**

राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज तब्बल ३८ महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. मुंबई आणि ठाण्याच्या विकासाच्या दृष्टीने चार निर्णय घेण्यात आले आहेत, ज्याचा फायदा मुंबईकर आणि ठाणेकरांना होणार आहे. ठाणे वर्तुळाकार मेट्रो रेल्वे, ऑरेंज गेट ते मरीन ड्राईव्ह भुयारी मार्ग, ठाणे ते बोरीवली भुयारी मार्ग, रमाबाई आंबेडकर नगर, कामराज नगरच्या एसआरए या प्रकल्पांबाबत मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय घेण्यात आले आहेत.

**ऑरेंज गेट ते मरीन ड्राईव्ह भुयारी मार्ग**

ऑरेंज गेट ते मरीन ड्राईव्ह भुयारी मार्गाच्या कामाला गती देण्यात येणार असून यासाठी एमएमआरडीएला बिनव्याजी दुय्यम कर्ज सहाय्य देण्यास मान्यतेचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

हा प्रकल्प ९ हजार १५८ कोटी रुपयांचा असून, राज्य शासनाच्या करासाठी ६१४ कोटी ४४ लाख रुपये, केंद्राच्या कराच्या पन्नास टक्के रकमेसाठी ३०७ कोटी २२ लाख रुपये, भुसंपादनासाठी ४३३ कोटी असे पान ४ वर ▶▶

# मुंबई-पुण्यासाठी भारतातील सर्वात उंच पूल

## २ पर्वतांमध्ये बांधला जाणार केबल ब्रिज

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/ (प्रतिनिधी) -**

मुंबई : मुंबई ते पुणे दरम्यान प्रवास करणाऱ्या प्रवाशांना जून २०२५ पासून २५ मिनिटे आधी पोहोचता येणार आहे.

प्रवासाचा वेळ कमी करण्यासाठी मिसिंग लिंक प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात पोहोचले आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर राज्यातील दोन मोठ्या शहरांमधील अंतर सुमारे सहा किमीने कमी होणार आहे. मुंबई-पुणे अंतर कमी करण्यासाठी देशातील सर्वात उंच केबल पूल दोन पर्वतांमध्ये बांधण्यात येत आहे. जून २०२५ पासून मुंबई ते पुणे दरम्यान प्रवास करणाऱ्या प्रवाशांना २५ मिनिटे आधी पोहोचता येणार आहे.

मिसिंग लिंक प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात असून, यामुळे दोन्ही शहरांमधील अंतर सुमारे सहा किमीने कमी होणार आहे. त्यात दोन बोगदे आणि दोन केबल पुलांचा समावेश आहे, जे पाऊस आणि जोरदार वारा सहन करण्यास सक्षम असतील.



केबल पूल जमिनीपासून सुमारे १८३ मीटर उंच आहे. हा पूल ८० टक्के पूर्ण झाला आहे. मुंबई पुणे द्रुतगती मार्गावरील खोपोली एक्झिट ते सिंहगड इन्स्टिट्यूट दरम्यानचे सध्याचे अंतर १९ किमी आहे. मिसिंग लिंकच्या बांधकामामुळे १९ किमीचे अंतर १३.३ किमी इतके कमी होणार आहे.

**बोगदा आणि केबिन पूल बांधला जात आहे**

मिसिंग लिंक प्रकल्पांतर्गत, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ १३.३ किमी लांबीचा नवीन मार्ग तयार करत आहे. यामध्ये दोन बोगदे आणि दोन केबल ब्रिज बांधले जात आहेत. १३.३३ किमीपैकी ११ किमी लांबीचा बोगदा आणि सुमारे २ किमीचा केबल पूल असेल. एमएसआरडीसीच्या म्हणण्यानुसार दोन्ही बोगद्यांचे खोदकाम पूर्ण झाले आहे. सध्या बोगद्याच्या आत फिनिशिंगचे काम सुरू आहे.

**पावसात कोणतीही अडचण येणार नाही**

मुंबई-पुणे प्रवासादरम्यान गाड्यांना खोपोलीजवळील घाट विभागातून जावे लागते. घाट विभागात अनेकदा अपघाताच्या घटना घडतात. त्याचबरोबर पावसाळ्यात काही वेळा भूस्खलनामुळे वाहतूक विस्कळीत होते. त्यामुळे मुंबईच्या दिशेने येणारी डोंगराला पान ४ वर ▶▶



**श्री.राजेश देशमुख कोकण विभागाचे नवीन विभागीय आयुक्त**

# महाराष्ट्रातील देशी गाय 'राज्यमाता-गोमाता' घोषित

## पशुपालकांना मिळणार प्रती गाय ५० रुपये अनुदान

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/ (वृत्तसेवा) -**

मुंबई : महाराष्ट्रात देशी गायींच्या संख्येत वाढ करून त्यांचे संवर्धन करण्याच्या दृष्टिने देशी गायींच्या पालनपोषणासाठी पशुपालकांना प्रेरित करण्यासाठी आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत महत्वाचा निर्णय घेण्यात आला आहे.

राज्य सरकारकडून आता देशी गायीला 'राज्यमाता-गोमाता' घोषित करण्याचा निर्णय कॅबिनेटच्या बैठकीत घेण्यात आला आहे. यासंबंधीचा शासकीय अध्यादेश नुकताच जारी करण्यात आला आहे.



राज्यात देशी गायींच्या संख्येत झपाट्याने घसरण होत आहे. देशी गायी एचएफ गायींच्या तुलनेत कमी दूध देत असल्याने शेतकऱ्यांना चारा-पाण्याचा खर्च परवडत नसल्याने देशी गायींच्या संवर्धनाकडे पशुपालकांचा कल कमी असतो. २०१९ साली झालेल्या २०व्या पशुगणनेनुसार महाराष्ट्रात देशा गायींची संख्या ४६ लाख १३ हजार ६३२ इतकी आढळून आली आहे. २०१२ मध्ये झालेल्या १९व्या पशुगणनेच्या तुलनेत महाराष्ट्रात गायींची संख्या २०.६९ टक्क्यांनी कमी झाल्याचे आढळून आले आहे. देशी गायींच्या संवर्धनासाठी 'राज्यमाता-गोमाता' जाहीर निर्णय घेण्यात आला आहे.

**गोशाळांना मिळणार प्रतीदिन, प्रती गाय ५० रुपये अनुदान**

राज्यात देशी गायींच्या संवर्धनासाठी प्रती गाय प्रती दिन ५० रुपये अनुदान देण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. गोशाळांना अत्यल्प उत्पन्न असल्याने त्यांच्या मदतीसाठी हा पान ४ वर ▶▶

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
जीवनदीप कॉलेज, गोवेली
मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न, नॅक मुल्यांकन (B-Grade) प्राप्त
ADMISSION OPEN 2024-25
११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE (IT / CS)
UNDER GRADUATE: B.Sc. Data Science, B.Sc. I.T., B.Sc. CHEMISTRY MATHS, B.M.S., B.A.F., BAMMC, B.Com., B.A.
POST GRADUATE: M.Sc. IT, M.Sc. CHEMISTRY, M.Com. ADVANCED ACCOUNTANCY, M.A. MARATHI, M.A. HISTORY, M.A. ECONOMICS, M.A. SOCIOLOGY, M.A. GEOGRAPHY, M.A. C&J
Look forward to a BRIGHTER FUTURE
8108559566
9619188558

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
सौ.कमलताई किसन कथोरे कॉलेज, म्हसा मुंबई विद्यापीठाशी संलग्न
ADMISSION OPEN 2024-25
११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE
UNDER GRADUATE: B.A., B.Com., B.Sc. CHEMISTRY, B.Sc. MATHS, BAF, BMS
POST GRADUATE: M.Sc. CHEMISTRY, M.Com. ADVANCED ACCOUNTANCY, M.A. MARATHI, M.A. ECONOMICS, M.A. SOCIOLOGY, M.A. HISTORY
Look forward to a BRIGHTER FUTURE
7719814142
9130580111

# वाडेघरच्या शितलादेवी नवरात्रौत्सवाचे ५१ वे वर्ष



कल्याण : कल्याण पश्चिमेतील वाडेघर येथील शितलादेवी मंदिरातील नावरात्रोत्सवाचे यंदा ५१ वे वर्ष आहे. या वर्षाचा देवीउत्सव साजरा करताना सर्व कार्यकर्त्यांचा समस्त देवी भक्तांचा आनंद द्विगुणीत आहे. तसेच उत्सवात धार्मिक कला क्रिडा सांस्कृतिक वैद्यकिय सामजिक कार्याची परंपरा अखंडित चालू आहे. याही वर्षी हि उत्सव परंपरा मोठया आनंदाने, हर्ष उल्हासाने, एकात्मतेने सांस्कृतिक वातावरणात उत्सव साजरा करण्यात येत आहे.सुमारे ५१ वर्षांपूर्वी म्हणजेच १९७३ साली कल्याण नगरीचे तत्कालीन समाजसेवक तथा वाडेघर गावचे सुपुत्र दिवंगत विष्णू भोईर व त्यावेळचे समाज कार्याच्या चळवळीतील युवकांनी एकत्र येवून प्रथमतः सामाजिक कार्याचे 'व्यासपिठ' म्हणून 'श्री एकविरा अभिवादन मित्र मंडळाची' स्थापना करण्यात आली. हे मंडळ कल्याण-वाडेघर तथा आजूबाजूच्या परिसरात १९७३ पासून ते आजतागायत सामाजिक क्षेत्रात अखंडित पणे कार्यरत आहे. मंडळाच्या वतीने 'श्री शितलादेवी नवरात्रौत्सव '१५ ऑगस्ट-स्वातंत्र्य दिन' '२६ जानेवारी प्रजासत्ताक दिन ' 'माघी गणेशोत्सव ' कोजागिरी पौर्णिमा महोत्सव' आरोग्य वैद्यकिय शिबिरे, विद्यार्थी मार्गदर्शन शिबिरे, महिला जनजागृती शिबिरे अशा प्रकारे 'धार्मिक- कला क्रिडा- सांस्कृतीक वैद्यकिय सामाजिक उपक्रम गेल्या ५१ वर्षा पासून सातत्याने राबवित आहे.

सन. १९७३ साली मंडळाने लावलेले हे सामाजीक कार्ययाचे रोपटे आज बहरलेले आहे. फुलले आहे त्याचे वटवृक्षात रुपांतर झाले आहे. ५१ वर्षांचा पल्ला पार करतांना आणि 'सुवर्ण महोत्सव' साजरा करतांना पूर्वीच्या आणि विद्यमान कार्यकर्त्यांचे योगदान आहे. नवरात्रौस्थापना दसरा सम्मेलन ते कोजागरी पौर्णिमे पर्यंत 'उत्सव' धार्मिक सांस्कृतिक वातावरणात साजरा करण्यात येणार आहे. ५१ व्या वर्षाच्या उत्सवात मोठया प्रमाणात सहभागी होऊन श्री शितलादेवी श्री दुर्गादेवीच्या दर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन डॉ. राजीव भोईर यांनी केले आहे.

# महाराष्ट्र वाल्मिकी ग.दि.मा



मराठीतील श्रेष्ठ साहित्यिक, कवी, गीतकार, पटकथा लेखक ग. दि. माडगूळकर उर्फ ग. दि. मा यांची आज १०५ वि जयंती. १ ऑक्टोबर १९१९ रोजी जन्मलेल्या गदिमांचे शिक्षण आटपाडी, कुंडल आणि औंध येथे झाले. गदिमा यांना लहानपणापासून लेखनाची आवड होती. जेष्ठ साहित्यिक वि. स. खांडेकर यांच्याकडे त्यांनी काहीकाळ लेखनिक म्हणून काम केले त्याचा त्यांना खूप फायदा झाला.वि स खांडेकर यांचे सर्व पुस्तके त्यांनी वाचून काढले. वि. स. खांडेकर यांच्याकडून प्रेरणा घेऊन त्यांनीही लिहिण्यास सुरवात केली. त्यांनी कथा आणि कविता यांचे विपुल लेखन केले. के. नारायण काळे यांचे सहाय्यक दिग्दर्शक म्हणून त्यांनी काही काळ काम केले. भक्त दामाजी आणि पहिला पाळणा या चित्रपटासाठी त्यांनी गीतलेखन केले. लोकशाहीर रामजोशी या गाजलेल्या चित्रपटासाठी त्यांनी गाणी लिहिली इतकेच नव्हे तर या चित्रपटाची कथा आणि संवादही त्यांनीच लिहिले. हा चित्रपट खूप लोकप्रिय झाला.

या चित्रपटाला खूप लोकप्रियता मिळाल्याने कवी आणि लेखक म्हणून त्यांचे नाव सर्वदूर पोहचले. या चित्रपटात त्यांनी छोटीशी भूमिकाही केली होती. त्यानंतर त्यांनी अनेक चित्रपटांसाठी पटकथा आणि गाणी लिहिली. त्यांच्या चित्रपटाच्या कथा वैविध्यपूर्ण होत्या. संवादही सोपे पण प्रेक्षकांच्या मनाला भिडणारे होते. त्यांनी दीडशेहून अधिक चित्रपटासाठी कथा लेखन केले. त्यांनी मराठी चित्रपटांसाठी लिहिलेले गीते चैत्रबन ह्या नावाने संग्रहित आहे, तसेच त्यांनी लिहिलेल्या काही चित्रकथा ही मराठी चित्रकथा या नावाने प्रकाशित झाल्या आहेत. गदिमांच्या कवितेवर ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, आदी संतांच्या कवितेप्रमाणेच पंडिती आणि शाहिरी कवितेचेही सखोल संस्कार झाले होते, ह्याचा प्रत्यय त्यांनी चित्रपटांसाठी लिहिलेल्या सुंदर घाटाच्या, परंतु प्रभावी गीतांतून येते. त्यांच्या कवितेतील अस्सल मराठमोळेपणामागेही हेच संस्कार दिसून येते. त्यांनी लोकगीते, समरगीते आणि बालगीतेही लिहिली. त्यांच्या गीतरामायणाने तर लोकप्रियतेचा उच्चांक गाठला. गीतरामायणाच्या कार्यक्रमाचे हजारो कार्यक्रम झाले अजूनही होत आहेत. गीतरामायण ऐकले नाही असा मराठी माणूस शोधूनही सापडणार नाही. लोकांना गीतरामायण इतके आवडले की लोकांनी त्यांना महाराष्ट्र वाल्मिकी ही पदवी दिली. ते कवी, लेखक तर होतेच पण उत्तम अभिनेतेही होते. पुढचं पाऊल, पेडगावचे शहाणे, लाखाची गोष्ट, वऱ्हाडी आणि वाजंत्री या चित्रपटात त्यांनी केलेल्या भूमिका संस्मरणीय ठरल्या. गदिमांनी केवळ मराठीतच नव्हे तर हिंदीतही आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले. त्यांच्या कथेवर आधारित २५ हिंदी चित्रपटाची निर्मिती झाली. दो आँखे बाराह हाथ, नवरंग, गुंज उठी शहनाई, तुफान और दिया, आदमी सडक का या गाजलेल्या हिंदी चित्रपटांची पटकथा त्यांनीच लिहिली. गुरुदत्त यांचा प्यासा, राजेश खन्ना यांचा अवतार, अमिताभ बच्चन, राणी मुखर्जी यांचा ब्लॅक या चित्रपटांच्या मूळ कथाही गदिमा यांच्याच. चार दशकांहुन अधिक काळ रसिकांच्या मनावर राज्य केलेल्या गदिमांचा पद्मश्री पुरस्कार देऊन सरकारने गौरव केला. १९७३ साली यवतमाळ येथे झालेल्या मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. महाराष्ट्र राज्याच्या विधानपरिषदेचेही ते सदस्य होते. १४ डिसेंबर १९७७ रोजी गदिमांचे निधन झाले. गदिमांसारखी बहुमुखी प्रतिमा असलेले रत्न मराठी मातीत जन्माला आले हे महाराष्ट्राचे भाग्यच. आपल्या बहुमुखी प्रतिमेने मराठी साहित्याची त्यांनी जी सेवा केली त्यासाठी मराठी माणूस कायम त्यांचा ऋणी राहील. बहुमुखी प्रतिमा आणि अष्टपैलू व्यक्तिमत्वाच्या जोरावर रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या गदिमांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम बसप्पा ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# २५-४५ वयोगटातील तरुणांमध्ये हृदयविकाराची ५० टक्क्यांनी वाढ

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/ (प्रतिनिधी) –**

कल्याण : बदलती जीवन शैली, आहार-विहाराच्या चुकीच्या सवयींमुळे हल्ली तरुणांमध्ये देखील हृदयविकाराचे प्रमाण वाढल्याचे दिसून येते. २५ ते ४५ वयोगटातील तरुणांमध्ये हृदयविकाराच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असून ही एक चिंतेची बाब ठरत आहे. मायोकार्डियल इन्फाक्शन आणि हृदयास झटका यास अनेक घटक कारणीभूत असतात. ज्यामध्ये शारीरिक हालचालींचा अभाव, खाण्याच्या चूकीच्या सवयी, तणाव, धूम्रपान, निद्रानाश, अल्कोहोलचा वापर, लठ्ठपणा, रक्तदाब निंयत्रित नसणे, रक्तातील साखर आणि कोलेस्टेरॉलची पातळीचा समावेश आहे.

तरुणांनी निरोगी जीवनशैली निवडणे गरजेचे आहे. जसे की नियमित व्यायाम, संतुलित आहार, पुरेशी झोप, योग आणि ध्यानाद्वारे तणावाचे व्यवस्थापन करणे आणि वजन नियंत्रित राखणे, धूम्रपान आणि मद्यपान सोडणे आणि रक्तदाब आणि कोलेस्ट्रॉल नियंत्रित करण्यासाठी तज्ज्ञांच्या सल्ल्याने औषधांचे सेवन करणे. हृदयाच्या आरोग्याकडे लक्ष देण्यासाठी दर सहा महिन्यांनी हृदय तपासणी करण्याचा सल्ला तज्ज्ञांनी दिला आहे.हृदयविकाराचा झटका ही आता वृद्धांची समस्या राहिलेली नाही. धक्कादायक बाब म्हणजे मोठ्या संख्येने तरुणांना हृदयविकाराचा झटका येऊन आपला अमुल्य जीव गमवावा लागत आहे. २५ ते ४५ वयोगटातील तरुणांमध्ये हृदयविकाराचा झटका येण्यामागील कारण हे रक्तवाहिन्यांमध्ये चरबी जमा झाल्यामुळे तसेच महाधमनीमधील रक्तप्रवाहात अडथळे येणे असू शकतो. ज्याला प्लाक बिल्ड-अप देखील म्हणतात. हळूहळू, प्लाक तयार होण्यामुळे धमन्या अरुंद होतात ज्यामुळे रक्तवाहिन्यांमध्ये रक्त प्रवाह मर्यादित होतो ज्यामुळे अथेरोस्क्लेरोसिस होतो. त्यामुळे हृदयविकाराचा झटका येऊ शकतो. बैठी जीवनशैली, कौटुंबिक इतिहास, आनुवंशिकता, शारीरिक हालचालींचा अभाव, तणाव, धूम्रपान आणि मद्यपान, झोपेचा अभाव, लठ्ठपणा, पदार्थांचे सेवन, अनियंत्रित रक्तदाब, मधुमेह, वाढलेली कोलेस्टेरॉल पातळी अशा विविध कारणांमुळे तरुणांमधील हृदयविकाराच्या झटक्यांमध्ये ५०% नी वाढ झाल्याची माहिती डॉ. गजानन गावंडे-पाटील, इंटरव्हेंशनल कार्डिओलॉजिस्ट, एम्स हॉस्पिटल, डोंबिवली यांनी दिली.हृदयाचे आरोग्य चांगले राखण्यासाठी तुमच्या कुटुंबाचा वैद्यकीय इतिहास समजून घेणे आवश्यक आहे. दर सहा महिन्यांनी नियमित हृदय तपासणी करून, रक्तदाब आणि रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करावी आणि कोलेस्टेरॉलची पातळीचे व्यवस्थापन करण्यासाठी लिपिड प्रोफाइल चाचण्या करणे आवश्यक आहे. संतुलित आहाराचे सेवन करणे, पुरेशी झोप घेणे, व्यायाम करणे, धूम्रपान आणि मादक पदार्थांचे सेवन कमी करणे, योगा आणि ध्यान यासारख्या तणावमुक्तीच्या तंत्रांचा सराव करणे आणि निरोगी वजन राखणे यामुळे हृदयाचे आरोग्य सुधारू शकते. जागतिक हृदय दिनानिमित्त योग्य खबरदारी घेत हृदयाचे आरोग्य कसे सुधारता येईल याकडे लक्ष द्या अशी प्रतिक्रिया डॉ. गजानन गावंडे-पाटील (इंटरव्हेंशनल कार्डिओलॉजिस्ट, एम्स हॉस्पिटल, डोंबिवली) यांनी व्यक्त केली.

# नेहा गायकवाडची राज्य, मुंबई व कोकण विभागीय स्पर्धेत निवड



कल्याण : महाराष्ट्र राज्य कुस्ती संघ राज्य स्पर्धेत महिला अजिंक्य कुमार गट स्पर्धा व कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्रीडा व सास्कृतीक विभाग जिल्हा स्तरीय महाराष्ट्र या दोन्हीही स्पर्धेत प्रथम क्रमांक घेऊन राज्य व मुंबई व कोकण विभागीय स्पर्धेत जय गावदेवी कुस्ती संकुल पिसवली तालीम मधील पहलवान नेहा अनंता गायकवाड हिची निवड झाली आहे. तिच्या या निवडीबद्दल तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. याआधी देखील नेहा हिने विविध स्पर्धांमध्ये पदके प्राप्त केली आहेत.

# मातोश्री महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या उद्बोधन कार्यक्रमाचे आयोजन

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/ (प्रतिनिधी) –**



कल्याण : शहाड येथील मातोश्री वेलबाई देवजी हरिया कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत उद्बोधन कार्यक्रमाचे आयोजन नुकतेच करण्यात आले. या कार्यक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजना कल्याण शहर क्षेत्र समन्वयक डॉ संदेश जायभाये प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी एम मुळे यांनी जायभाये यांचे स्वागत करत कार्यक्रमाचे प्रास्ताविक सादर केले. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. कविता मांजे यांनी राष्ट्रीय सेवा योजने संदर्भात आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी डॉ. संदेश जायभाये यांनी राष्ट्रीय सेवा योजनेची उद्दिष्टे, राष्ट्रीय सेवा योजनेत राबविले जाणारे विविध कृती कार्यक्रम याविषयी अनमोल मार्गदर्शन केले.

राष्ट्रीय सेवा योजनेतून संपूर्ण व्यक्तिमत्त्वाचा विकास कसा साधला जातो हे आपल्या मार्गदर्शनातून स्वयंसेवकांना पटवून दिले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. चिंतामण भोईर व्यासपीठावर उपस्थित होते. या उद्बोधन कार्यक्रमासाठी महाविद्याल यातील सर्व प्राध्यापक उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजना उपकार्यक्रम अधिकारी प्रा. सुनंदा शिंदे यांनी केले.

## ॲड.निलम शिर्के सामंत यांच्या उपस्थितीत

# बालकलाकारांनी सादर केला लोककलेचा महाजल्लोष



कल्याण : बालरंगभूमी परिषद मध्यावर्तीच्या अध्यक्षा ॲड.निलम शिर्के - सामंत यांच्या संकल्पनेतून 'जल्लोष लोककलेचा' हा लोककला महोत्सव आचार्य अत्रे रंगमंदिर येथे मोठ्या दिमाखात नुकताच संपन्न झाला. बालरंगभूमी परिषद मध्यवर्ती आयोजित,बालरंगभूमी परिषद कल्याण शाखेने कल्याण डोंबिवली महानगर पालिका शिक्षण विभागाच्या सहकार्याने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. मध्यावर्तीच्या अध्यक्षा ॲड. निलम शिर्के - सामंत,कार्याध्यक्ष राजू तुलालवार, प्रमुख कार्यवाह सतीश लोटके, सहकार्यवाह दिपाली शेळके, पुणे शाखेचे उपाध्यक्ष अरुण पटवर्धन, नाट्य परिषद कल्याण शाखेचे अध्यक्ष रविंद्र सावंत, साहित्यिक जेष्ठ नाटककार जनार्दन ओक, परिक्षक शिवपाईक योगेश चिकटगावकर, विकास कोकाटे, सुजाता- कांबळे डांगे या मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन सोहळा संपन्न झाला. यावेळी कल्याण शाखेचे अध्यक्ष सतिश देसाई , कार्याध्यक्ष शिवाजी शिंदे, उपाध्यक्षा प्रिती बोरकर, कोषाध्यक्ष विश्वनाथ गिरी, सहकार्यवाह संजय गावडे व दिपक कुंभार व्यासपीठावर उपस्थित होते.तर कार्यकारिणी सदस्य विशाल पितळे, सौरभ आरोटे, मीनल ठाकूर, सुरेखा गावंडे, मेघा श्रृंगारपुरे, चेतन दुर्वे, भूषण मेहेर कार्यक्रमास उपस्थित होते. कार्याध्यक्ष शिवाजी शिंदे यांनी प्रास्ताविक केले व अध्यक्षा ॲड.निलम शिर्के - सामंत यांनी मनोगत व्यक्त करताना बालकल ावंतांचे भरभरून कौतुक करून स्पर्धेसाठी आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. व महोत्सवाचे भव्यदिव्य देखणे आयोजन बघून कल्याण बालरंगभूमी परिषदेचे कौतुक करून समाधान व्यक्त केले. सांघिक नृत्याने महोत्सवाची दणक्यात सुरुवात झाली. गोंधळ, जोगवा, शेतकरी नृत्य, कोळी नृत्य बघून पाहुणे प्रेक्षक भारावून गेले. सांघिक गायन, एकल वादन, एकल गायन, एकल नृत्य अश्या एकापेक्षा एक लोकनृत्याचे सदरिकरण झाले. रसिकप्रेक्षकांनी टाळयांच्या गजरात उत्तम प्रतिसाद दिला. कल्याण शाखेला उत्तम नियोजन करून कलावंतांना रंगमंच उपलब्ध करून दिल्याबद्दल धन्यवाद दिले.

सादरीकरण संपल्यानंतर लगेच पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. प्रमुख पाहुणे म्हणून लोककलावंत संदेश उमप, हेमंत यादगिरे, रवींद्र सावंत, माणिक शिंदे, मान्यवर परीक्षक व बालरंगभूमी परिषद कल्याण शाखेचे पादाधीकारी या मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. कार्याध्यक्ष शिवाजी शिंदे यांनी कल्याण डोंबिवली महानगर पालिकेचे आयुक्त व शिक्षण विभागाचे उपायुक्त व पदाधिकारी यांनी अत्रे रंगमंदिर उपलब्ध करून दिल्याबद्दल सर्वांचे आभार मानले.

## केडीएमसी मुख्यालयावर

# संतप्त महिलांचा पाणी टंचाईप्रश्नी मडके मोर्चा

### पाणी टंचाई, रस्ता प्रश्नाबाबत महिलांनी केडीएमसीसमोर घागर फोडत व्यक्त केला संताप



कल्याण : कल्याण पश्चिमेतील काही भागांमध्ये पाणी पुरवठा वितरणाच्या नियोजन शून्य कारभाराचा फटका बसत असल्याने नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. तर घागरभर हंडाभर पाण्यासाठी महिलांना वणवण करावी लागण्याची वेळ प्रशासनाच्या सावळा गोंधळ कारभारामुळे आली आहे. अनेकदा तक्रारी करूनही केडीएमसीकडून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करीत सोमवारी शेकडो महिलांनी केडीएमसी मुख्यालयावर रिकामे माठ (घागर) घेऊन मोर्चा काढला. यावेळी महिलांनी मडके फोडून केडीएमसीच्या गलथान कारभाराचा तीव्र निषेध करीत संताप व्यक्त केला.

कल्याण पश्चिमेतील बेतूरकरपाडा, चिकणघर, काळातलाव आदी भागांतील नागरिकांना पाणीटंचाई आणि दूषित पाणी पुरवठा समस्येचा सामना करावा लागत आहे. पाणी समस्येबाबत नागरिकांनी केडीएमसी प्रशासनाकडे वारंवार तक्रारी केल्या असल्या, तरी पदरी मात्र आश्वसन दिले जाते. आणि समस्या कायम याबाबत प्रशासनकडून ठोस काहीच कार्यवाही होत नसल्याचे नागरिकांनी सांगीतले. केडीएमसीच्या नियोजनशून्य कारभारामुळे पाणी टंचाई आणि दूषित पाण्याचा सामना करावा लागतो, असा आरोप करत शेकडो संतप्त महिलांनी केडीएमसी मुख्यालयावर मडके मोर्चा काढला. चिकणघर काळा तलावचा सर्वांगीण विकास खुंटला, पाणी व रस्त्याकरीता जनतेचा उद्रेक मोर्चा. असे बॅनर हातात घेऊन महिलांनी घोषणाबाजी करत मडके फोडून निषेध नोंदवला.

यावेळी बोलताना महिलांनी पाणी बिले वसूल केली जातात मात्र पाणी दिले जात नाहीत,पाणी बिले उशिराने भरली तर थकीत बिलांवर व्याज लावले जाते आम्हाला महिनोंमहिने पाणी टंचाईला समोरे जावे लागत आहे. पाणी टंचाई प्रश्न कधी सुटणार अशी संतप्त प्रतिक्रिया खडकपाडा व्यापारी रहिवासी संघटनेचे अध्यक्ष उमेश बोरगावकर यांनी दिली.या मोर्चा नंतर ही प्रशासनास जाग नाही आली व जलद योग्य कार्यवाही नाही केली तर संबंधित अधिकाऱ्यांना त्यांच्या कॅबिन मध्ये बसू दिले जाणार नाही, असा इशारा उमेश बोरगांवकर यांनी दिला आहे.


**दैनिक जीवनदीप वार्ता**

**मध्ये कंपनी, मिळकत, जमीन- जुमला, सहकारी संस्थांच्या नोटीस तसेच बक्षीसपत्र, घटस्फोट, पोटगी, नावात बदल आदी कायदेविषयक छोट्या जाहिरातीना केवळ ५००/- रुपयांत प्रसिद्धी दिली जाईल; कोणत्याही शासकीय नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क साधा.**

**:: कार्यालय ::**

**९६१९१८८५५८ / ९१५८०७८६०१**

**- E Mail -**

**jeevandeepvartanews2020@gmail.com news.thanejeevandeep@gmail.com**


## दैनिक राशिफल

०१ ऑक्टोबर २०२४

मंगळवार

**मेष**

बोलण्यावर नियंत्रण ठेवा. कौटुंबिक वातावरण चांगले राहील. प्रेमी युगुलांसाठी दिवस चांगला जाणार आहे. तुम्हाला इच्छेनुसार निकाल मिळेल.

**वृषभ**

विद्यार्थ्यांसाठी आजचा दिवस समाधानकारक असेल, त्यांना काहीतरी नवीन शिकायला मिळेल.वयोवृद्ध व्यक्तीची सेवा करण्याची संधी मिळेल.

**मिथुन**

तुम्ही जे काही काम करण्याचा प्रयत्न कराल, त्या कामात तुम्हाला यश मिळेल. आज तुम्हाला तुमच्या मेहनतीचे फळ मिळेल, यामुळे तुमचे मनोबल वाढेल.

**कर्क**

तुम्हाला तुमचा व्यवसाय इतर ठिकाणी हलवायचा असेल, तर ती जागा काळजीपूर्वक तपासा. एखाद्यासोबत भागीदारीसाठी दिवस चांगला जाईल.

**सिंह**

सर्व प्रकारची कामे पूर्ण करण्यास तयार असाल. विचारपूर्वक केलेल्या कृतीतून तुम्हाला फायदा होऊ शकतो. प्रयत्न केल्यास यश मिळू शकते.

**कन्या**

तुम्ही आव्हानांचा सामना कराल, तुम्ही त्यांचा धैर्याने सामना कराल आणि तुम्हाला यश मिळेल. या राशीच्या विद्यार्थ्यांसाठी दिवस सामान्य असेल.

**तूळ**

नोकरदार महिलांसाठीही दिवस चांगला राहील.यामुळे घरात आनंदाचे वातावरण निर्माण होईल.आजूबाजूचे लोक तुमच्या मेहनतीने प्रभावित होतील.

**वृश्चिक**

राजकारणाशी संबंधित लोकांसाठी दिवस चांगला आहे, समाजहितासाठी केलेल्या कामाचे कौतुक होऊ शकते.नोकरीत नवीन यश मिळण्याची शक्यता आहे.

**धनु**

करिअरशी संबंधित निवड तुम्हाला काही अडचणीत टाकू शकते परंतु योग्य बिंदू निवडणे चांगले होईल. कुटुंबासोबत वेळ घालवाल. तुमचे आरोग्य चांगले राहील.

**मकर**

तुमचे अनुसरण करतील. आज व्यवसायात नेहमीपेक्षा चांगला फायदा होईल. आर्थिक बाजू पूर्वीपेक्षा मजबूत होईल.घरातील ज्येष्ठांचे मत अवश्य घ्या.

**कुंभ**

घरगुती जीवनावश्यक वस्तू खरेदी कराल आणि तुमचे व्यवहारही जलद होऊ शकतात. जबाबदारी मिळू शकते जी तुम्ही चांगल्या प्रकारे पार पाडाल.

**मीन**

महिलांसाठी आजचा दिवस चांगला आहे जे कोणताही व्यवसाय करण्याचा विचार करत आहेत. कोणतेही काम करताना घाई करू नका.

### शशिकांत घरत, ग्रा. प. सदस्य यांनी

# ग्रामस्थासह रात्रीच केली पूरसदृश्य चाफेवाडीची पाहणी



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता / (प्रतिनिधी) -**

सफाळे : हवामान खात्याने व जिल्हाधिकारी पालघर यांच्या कडून पालघर जिल्ह्यात मुसळधार पणे कोसळणाऱ्या पावसामुळे होणारे नुकसान व सावधानतेचा इशारा दिला होता.

त्या अनुषंगाने रात्रीच्या वेळी धोधो कोसळणाऱ्या पावसात, सफाळे पश्चिमेस असलेल्या विराथन बुद्रुक ग्रामपंचायत, ता. जि. पालघर, सदस्य शशिकांत घरत आणि जागृत नागरीक, माजी ग्रामपंचायत सदस्य दत्तात्रेय पाटील, दिलीप किणी मच्छिमार संघटना पदाधिकारी, तसेच सुरेंद्र घरत, अक्षय पाटील, शुभम घरत, प्रणय पाटील, शुभम पाटील, महेश घरत आदींनी काल रात्री कोसळत असलेल्या मुसळदार पावसामुळे विराथन बुद्रुक येथील तलाव पाडा, चाफेवाडी विभागात पडणाऱ्या पावसामुळे पूरदृश्य परिस्थिती निर्माण झाली असता, चाफेवाडी येथील जोरदार पणे पडणाऱ्या पावसाच्या पाण्याने रस्ते पूर्ण भरले होते. तर जाण्यासाठी असलेल्या रस्त्यावरून पाणी वाहत होते. अश्या प्रसंगी काही अघटित घडू नये म्हणून खबरदारी साठी. विजेच्या ( बॅटरी ) प्रकाशात प्रवाहाच्या पाण्याचे निरीक्षण करीत. रात्री ग्रामस्थाना सावधानता बाळगण्यासाठी सावधान राहायला माहिती देत होते.

# मुंबई विद्यापीठाच्या 'युथ फेस्टिवल' मध्ये एसएसटी महाविद्यालयाची मोहोर

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता / (प्रतिनिधी) -**

कल्याण : मुंबई विद्यापीठाच्या ५७ व्या युथ फेस्टिवल प्राथमिक फेरीत एसएसटी महाविद्यालयाच्या संजीवनी सांस्कृतिक विभागाच्या स्पर्धकांनी आपल्या विविध कलागुणांचे अप्रतिम प्रदर्शन करत अनेक बक्षिसे पटकावली. त्यापैकी प्राथमिक फेरीत एसएसटीयन समाधान बागुल याने ऑन द स्पॉट पेंटिंग, व्यंगचित्र आणि पोस्टर मेकिंग स्पर्धेत पारितोषिक पटकावून अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले होते. नुकत्याच झालेल्या अंतिम फेरीचे निकाल हि



जाहीर झाले असून त्यात देखील समाधान याने उत्तम कामगिरी बजावली आहे.

कार्टूनिंग म्हणजेच व्यंगचित्र गटात त्याने रौप्य पदक मिळवले, तर ऑन द स्पॉट पेंटिंग या स्पर्धेत कांस्य पदक पटकावून त्याने आपले कौशल्य पुन्हा एकदा सिद्ध केले. पोस्टर मेकिंग स्पर्धेत देखील समाधान याला उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त झाले आहे. या निकालातून अंतिम फेरीत दाखल झालेल्या स्पर्धकांनी पुन्हा जिंकण्याच्या दृष्टीने केलेल्या प्रयत्नांना यश मिळत असल्याचे दिसून येत आहे.

महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाचे प्रोत्साहन आणि सहकार्य असल्याने सांस्कृतिक विभागाचे विद्यार्थी आपल्या कलागुणांना वाव देत विविध स्तरांवर यश संपादन करत आहेत. यामध्ये सांस्कृतिक विभागाचे समन्वयक डॉ तुषार वाकसे आणि त्यांच्या सर्व सदस्य सहकारी शिक्षकवृंदाने केलेले मार्गदर्शन विद्यार्थ्यांसाठी निश्चितच महत्वाचे ठरत आहे. समाधान ने प्राप्त केलेल्या या यशाबद्दल त्याचे व्यवस्थापन, प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्ग आणि विद्यार्थी यांचे कडून कौतुक होत आहे.

# मुरबाड तालुक्यातील देवी भक्तांना नवरात्रोत्सवाचे वेध

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता / (प्रतिनिधी) -**

मुरबाड : मुरबाड तालुक्यातील ग्रामीण भागात तसेच आदिवासी पट्ट्यात गणेशोत्सवानंतर लगेचच येणाऱ्या नवरात्रोत्सवाची धुम आता ग्रामीण सह शहरी भागात सुरू होणार आहे दोन दिवसावर नवरात्रौत्सव येऊन ठेपला आहे.

सार्वजनिक सह घरगुती नवरात्र उत्सवाचे लगबग सर्वत्र सुरू आहे अनेक ठिकाणी सार्वजनिक नवरात्रौत्सव मंडप सजावट अंतिम टप्प्यामध्ये आहे.

नऊ दिवस चालणाऱ्या नवरात्रौत्सव मध्ये रास गरबा या मध्ये तरुणाई रात्र रात्रभर जागून दांडिया रास आनंद घेत अस तात शहरी भागासह ग्रामीण भागातील दांडिया रास खेळण्यासाठी सर्वजण तयारीमध्ये राहिलेले आहेत विविध होम पूजाअर्चा यासाठी अनेक भक्तगण नवस फेडण्यासाठी सज्ज झालेले आहेत अंबा माते की जय भवानी माते की जय असा जयघोष नवरात्गुंरौत्सव मध्ये रंगणार आहे. तालुक्याच्या ग्रामीण भागासह शहरी भागात सार्वजनिक नवरात्र उत्सवाची मंडळ नवरात्र उत्सव साजरा करण्यासाठी सज्ज झालेले आहेत तालुक्यातील टोकावडे, सरळगाव, शिवळे, धसई, म्हसा, नारिवली ,किसल तसेच मुरबाड शहर परिसरातील अशा मोठी लोकसंख्या असलेल्या गावांमध्येही सार्वजनिक नवरात्रोत्सवाची तयारी सुरू आहे.

# 'ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेस' मुदतवाढ मिळणार

## - आमदार किसन कथोरे यांचे आश्वासन

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता / (प्रतिनिधी) -**

मुरबाड : ओबीसी विद्यार्थ्यांसाठी शासनाने सुरू केलेल्या 'ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेस' मुदतवाढ मिळण्यासाठी शासनाकडे मागणी केली जावी यासाठी आज मुरबाड चे कार्यसम्राट आमदार किसनजी कथोरे यांना कुणबी समाजोन्नती संघ, मुंबई शाखा-शहापूर कडून निवेदन देण्यात आले.

११ मार्च २०२४ पासून सदर योजना लागू करण्यात आली आहे. सदर योजने अंतर्गत १२ वी नंतर उच्च शिक्षण घेणाऱ्या ज्या ओबीसी मुला/मुलींना शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळालेला नाही अशा प्रत्येक जिल्ह्यातील ६०० विद्यार्थ्यांना म्हणजे ३६ जिल्ह्यांतून एकूण २१६०० ओबीसी मुला - मुलींना या योजनेचा लाभ मिळणार आहे. शिक्षणासाठी



बाहेरगावी राहणाऱ्या विद्यार्थ्यांना निवास व अन्य अशा खर्चापोटी गाव/शहराच्या स्तरानुसार वार्षिक ६०००० पर्यंत निर्वाह भत्ता मिळणार आहे. परंतु शासन व प्रशासनाकडून या योजनेची माहिती ओबीसी समाजापर्यंत पोहचवण्यासाठी योग्य प्रकारे प्रयत्न केले गेले नसल्याने संपूर्ण राज्यातून अगदी अल्प प्रमाणात विद्यार्थ्यांकडून अर्ज केले गेले आहेत. ठाणे जिल्ह्यासारख्या ओबीसी बहुल जिल्ह्यातून ६०० विद्यार्थी प्रवेशांपैकी फक्त ६५ विद्यार्थीच अर्ज करू शकले आहेत. उच्च शिक्षण घेणाऱ्या द्वितीय/तृतीय/ चतुर्थ वर्षांचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीची अर्ज करण्याची मुदत ३० सप्टेंबर रोजी व प्रथम वर्षाचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची अर्ज करण्याची मुदत १५ ऑक्टोबर रोजी संपुष्टात येणार आहे. आजच्या घडीला २१६०० ओबीसी विद्यार्थ्यांपैकी १०३ विद्यार्थीही योजनेची माहिती तळागाळापर्यंत न पोहोचल्याने व मुदत कमी असल्याने लाभ घेऊ शकत नाही.

यास्तव या योजनेस किमान २ महिने मुदतवाढ मिळावी अशी मागणी कुणबी समाजोन्नती संघ, मुंबई शाखा शहापूर तर्फे करण्यात आलेली आहे, यावेळी निवेदन देण्यासाठी शाखा सरचिटणीस उमेश पाटील, किन्हवली विभाग अध्यक्ष राजेश वेखंडे,राष्ट्रीय ओबीसी महासंघ मुरबाड तालुकाध्यक्ष मिलिंद मडके, ओबीसी कर्मचारी अधिकारी महासंघ मुरबाड तालुकाध्यक्ष सोपान गोल्हे, माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ मुरबाड तालुकाध्यक्ष व पत्रकार दिलीप पवार, सामाजिक कार्यकर्ता ज्योतिताई गोडांबे , सौ. घोरडताई उपस्थित होते.

# मुरबाड तालुका राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या अध्यक्षपदी पुन्हा दिपक वाघचौंडे



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता / (प्रतिनिधी) -**

मुरबाड : राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार ठाणे जिल्हा ग्रामीण अध्यक्षा सौ.विद्याताई वेखंडे यांच्या शुभहस्ते आज राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार मुरबाड तालुका अध्यक्षपदी दिपक वाघचौडे यांना नियुक्तीपत्र देऊन फेरनिवड करण्यात आली. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष,पद्मविभूषण शरदचंद्रजी पवार साहेब यांचे विचार सर्वदूर पोहोचवण्यासाठी, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष जयंतजी पाटील , माजी मंत्री.जितेंद्रजी आव्हाड , खासदार. सुरेश (बाळयामामा) म्हात्रे , ठाणे जिल्हाध्यक्ष सौ.विद्याताई वेखंडे यांच्या मार्गदर्शनाखाली या पुढील काळात आणखीन नव्या उमेदीने व जोमाने तळागाळातील जनतेला व पदाधिकाऱ्यांना न्याय मिळून देण्यासाठी प्रचंड मेहनत करण्यात येतील हा विश्वास देतो असे दिपक वाघचौडे यांनी बोलून दाखविले तसेच पक्षाने पुन्हा दाखवलेल्या विश्वासाबद्दल पक्षाचे आभार मानले आहेत.



# मुख्यध्यापिका सौ अर्चना मोहिते यांना महाराष्ट्र प्रतिभारत्न पुरस्काराने गौरवण्यात आले

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता / (प्रतिनिधी) -**

Rediant Talant Book of Record आयोजित महाराष्ट्र प्रतिभारत्न पुरस्कार २०२४ च्या पुरस्काराने ग्रीन्स इंग्लिश स्कूल च्या मुख्यध्यापिका सौ अर्चना अरविंद मोहिते यांना तानाजी मालूसरे यांचे वंशज सुभेदार कुणाल मालूसरे तसेच भगत सींग यांचे वंशज सरदार करणजीत सींग यांच्या हस्ते व इतर मान्यवरांच्या उपस्थितित आचार्य अत्रे रंगमंदिर पिंपरी चिंचवड पुणे येथे २९ सप्टेम्बर २०२४ रोजी सन्मानित करण्यात आले.

# आम्ही 'कामगार रंगभूमी'च्या कुशीतून घडलो

## - ज्येष्ठ साहित्यिक नारायण जाधव



कल्याण : रंगभूमीच्या मागचं नाटक महत्वाचं असतं. संपूर्ण कामगार संस्कृती काळाच्या पडद्याआड गुडूप झाली आहे. 'आम्हांला स्वगत लिहिता येत नाही' ही आताच्या कलाकारांची समस्या आहे. आमची पिढी कामगार रंगभूमीच्या कुशीतून-मुशीतून घडली असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक, सिने नाट्य अभिनेते नारायण जाधव यांनी सार्वजनिक वाचनालय कल्याण आयोजित 'अंतर्बाह्य'- नारायण जाधव या कार्यक्रमात केले. विक्रम गोखले यांचे अनेक किस्सेही त्यांनी कथन केले.

रंगाकडून अंतरंगाकडे जाणे हीच रंगभूमीची व्याख्या आहे. आम्ही गरीब होतो हे आम्हाला बालपणी माहित नव्हतं तीच आमची श्रीमंती होती, असे स्वमत ज्येष्ठ कवी, साहित्यिक अशोक बागवे यांनी केले. प्रसंगी धनश्री करमरकर यांनी नारायण जाधव यांच्या 'गंधरेषा' कथेचे अभिवाचन केले. डॉ. गिरीश कुलकर्णी यांनी त्यांच्या 'तुझ्या संदर्भाचे स्मरण चांदणे' या आत्मपर कादंबरीमधील उताऱ्याचे वाचन केले. संवेदना प्रकाशनचे प्रकाशक नितीन हिरवे यांनी 'कामगार रंगभूमीचा सफलनामा' या नारायण जाधव यांच्या आगामी पुस्तकासाठी त्यांना अनेक शुभेच्छा दिल्या. १६१ व्या वर्षात पदार्पण करणाऱ्या सार्वजनिक वाचनालय कल्याणासाठी नारायण जाधव यांची दिलखुलास मुलाखत ही अत्यंत गौरवाची बाब आहे असे मत वाचनालयाचे सरचिटणीस भिकू बारस्कर यांनी मांडले. लेखक किरण येले आणि मंगेश सातपुते यांनी नारायण जाधव यांना मुलाखतीच्या माध्यमातून त्यांचे अस्सल अंतरंग उलगडून प्रेक्षकांना खिळवून ठेवले.

प्रसंगी वाचनालयाचे अध्यक्ष मिलिंद कुलकर्णी, ज्येष्ठ कवी सतिश सोलांकुरकर, रंगभूमी किरण खांडगे, अनेक ज्येष्ठ नाट्य कलावंत, वाचनालयाच्या ग्रंथसेविका आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुधीर चित्ते यांनी केले.

# मतदान वाढीसाठी व्हीव्हीएम मशिन व्हॅनद्वारे जनजागृती



वासिंद : शहापूर तालुक्यातील मतदानाचा टक्का वाढावा यासाठी ग्रामीण भागातील गावोगावी व्हॅनच्या माध्यमातून जाऊन व्हीव्हीएम मशिन द्वारे लोकांना प्रात्यक्षिक दाखवून जनजागृती केली जात आहे.

निवडणूक विभागाच्या वतीने १० सप्टेंबर ते १० ऑक्टोबर या कालावधीत हि जनजागृतीपर उपक्रम मोहीम हाती घेतली आहे. ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या आदेशान्वये शहापूर तहसीलदार परमेश्वर कासुळे यांच्या मार्गदर्शना खाली तर निवडणूक विभाग अधिकारी एस.के. ढमसे यांच्या देखरेखीखाली सदर तालुक्यात ही उपक्रम मोहीम सुरू आहे.

शहापूर विधानसभा मतदारसंघात एकूण ३२९ मतदार केंद्र असून यामध्ये शहापूर तालुक्यात २८० तर वाडा तालुक्यात ४९ मतदार केंद्र आहेत. सदर तालुक्यातील मतदानाचा टक्का वाढावा म्हणून व्हॅनच्या माध्यमातून गावोगावी जाऊन व्हीव्हीएम मशिन द्वारे लोकांना प्रात्यक्षिक दाखवून जनजागृती केली जात असून या प्रात्यक्षिकेसाठी मंडळ अधिकारी व तलाठी यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या असल्याचे निवडणूक विभाग नायब तहसीलदार एस.के. ढमसे यांनी सांगितले. दरम्यान, मागील झालेल्या लोकसभा निवडणुकीत तालुक्यात ७०. २६ मतदान झाले होते मात्र आगामी विधानसभा निवडणुकीत ८० टक्के पर्यंत मतदानाचा संकल्प आखला आहे तर निवडणूक विभागाच्या नियमानुसार दुबार आणि मयत असलेली नावे मतदार यादीतून कमी केलेली आहेत यामुळे मतदानाची टक्केवारी वाढणार असल्याचे ढमसे यांनी म्हटले.

# महाराष्ट्र राज्य ग्रामिण जीवनोन्नती अभियानाचे वार्षिक स्नेहसंमेलन आमदार कथोरेंच्या उपस्थित साजरा





**दै.ठाणे जीवनदीप वार्ता / (प्रतिनिधी) -**

मुरबाड : उमेद- महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत गरुडझेप प्रभाग संघ, कुडवली, तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष, पंचायत समिती मुरबाड यांची वार्षिक सर्वसाधारण सभा आज माऊली गार्डन हॉल, मुरबाड येथे आमदार किसन कथोरेंच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली.

उमेदच्या माध्यमातून सुरू असलेल्या विविध उपक्रमांचे यावेळी मनापासून कौतुक केले आणि उपस्थित सर्वांशी संवाद साधून योग्य ते मार्गदर्शन केले. तसेच लोकप्रतिनिधी या नात्याने मतदारसंघातील विविध कामे पूर्णत्वास आणण्यासाठी सदैव सकारात्मक दृष्टीने कार्य करीत राहीन आणि विशेष म्हणजे महिलांच्या सक्षमीकरणासाठीही पुरेपूर योगदान माझ्या वतीने देईन, अशी ग्वाही यावेळी उपस्थित उमेदच्या महिलांना दिली. यावेळी टिडीसी बॅंकेचे संचालक राजेश पाटील,सरचिटणीस नितिन मोहपे, युवा नेते अनिल घरत, संतोष पवार उपस्थित होते.

# ठाणे जिल्हयामधुन हजारो चर्मकार बांधव मंगळवारी आझाद मैदानावर



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता / (प्रतिनिधी) -**

कल्याण : चर्मकार समाजाच्या विविध मागण्यासाठी राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने मंगळवारी १ आक्टोबर रोजी मुंबई येथील आझाद मैदानावर मोर्चा आयोजित केला आहे. ठाणे जिल्ह्यातून हजारो चर्मकार बांधव मोर्चात सहभागी होत असल्याची माहिती राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे ठाणे जिल्हाध्यक्ष राम बनसोडे यांनी दिली.

राज्याचे माजी समाज कल्याणमंत्री बबनराव घोलप यांच्या मार्गदर्शना खाली चर्मकार समाजाच्या प्रमुख मागण्यांविषयी मोर्चा काढला जात आहे. याकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी महाराष्ट्रातील चर्मकार बांधव दि. १ ऑक्टोबर रोजी मुंबई येथील आझाद मैदानावर धडकणार आहेत. या अनुषंगाने कल्याणमध्ये बैठक झाली. ठाणे जिल्ह्यातील सात तालुक्यांसह २४ विधानसभा क्षेत्रातून विविध भागांतील समाजबांधवांच्या बैठका घेण्यात आल्या. या बैठकीत ठाणे जिल्ह्यातून हजारो समाज बांधव मोर्चात सहभागी होण्याचा निर्धार करण्यात आला. यावेळी संघटनेचे अनेक पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# झोपेमध्ये अचानक आलेला हार्ट अटॅक आणि वेळीच वैद्यकीय मदत मिळविण्याचे महत्त्व

**– डॉ. विवेक महाजन**

अलीकडेच मुंबई क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अमोल काळे यांना झोपेत हृदयविकाराचा झटका आल्याची व त्यात त्यांचा मृत्यू झाल्याची बातमी आली. काळे यांच्याबाबतीत घडलेली घटना अशा अनेक दुर्दैवी घटनांपैकी एक होती आणि २७ टक्के हार्ट अटॅक्स हे झोपेमध्येच येतात असा अंदाज या विषयावरील पाहण्यांमधून मांडला गेला आहे. हार्ट अटॅक्स किंवा अचानक झालेले कार्डिॲक अरेस्ट या घटना दिवसाच्या वेळी अधिक प्रमाणात घडतात, मात्र रात्री झोपेतही त्या घडण्याची उदाहरणे दुर्मिळ नाहीत. तरीही योग्य लक्षणांना समजून घेतल्यास काही रुग्णांचे प्राण वाचविता येणे शक्य आहे. अशीच एक दुर्मिळ घटना ५० वर्षीय भारत तळेले यांच्याबाबतीत घडली. बदलापूर इथे राहणाऱ्या व विमा एजंट म्हणून काम करणाऱ्या भरत यांनी आपल्याला लक्षणे जाणवू लागल्यावर तत्परतेने कृती केली, तत्काळ वैद्यकीय मदत मिळवली, ज्यामुळे त्यांना वेळीच आवश्यक ते उपचार मिळण्यास मदत झाली. कामावर जात असताना त्यांना अस्वस्थ वाटू लागल्यावर ते लगेच डॉक्टरांकडे गेले. तिथे इलेक्ट्रोकार्डिओग्राम (ECG) काढला असता त्यात खूप मोठे चढउतार दिसून आले, त्यांचा रक्तदाबही वर खाली होत होता.

क्लिनिकमध्ये असतानाच ते कोसळले आण त्यांच्यावर तातडीने CPR (कार्डिओ पल्मनरी रिससायटेशन) दिले गेले.

त्यांना हार्ट अटॅक येऊन गेल्याची पुष्टी त्यांच्या मेडिकल रिपोर्ट्समधून झाली. त्यांना लगेचच त्यांच्यावर कोरोनरी अँजिओग्राफी करण्यात आली व त्यानंतर तातडीने प्रायमरी अँजिओप्लास्टी केल्यावर त्यांच्या तब्येतीमध्ये सुधारणा झाली.

आपल्याला जाणवलेल्या लक्षणांकडे दुर्लक्ष न केल्यामुळेच हे शक्य झाले. तळेले यांच्या या उदाहरणातून हार्ट अटॅकची लक्षणे समजून घेणे किती महत्त्वाचे आहे हे दिसून येते आणि जीवदान देणारी उपाययोजना म्हणून CPR चे महत्त्व जितके सांगावे तितके थोडे आहे. अमोल काळे यांना मात्र ते झोपेत असताना कार्डिॲक अरेस्ट झाले.

सर्वसाधारणपणे झोपेत येणाऱ्या हार्ट अटॅकच्या वेळीही हा प्रसंग दिवसा घडल्यास जाणवू शकणाऱ्या प्री-मॉनिटरी लक्षणांसारखी लक्षणे जाणवू शकतात. झोपेमध्ये कार्डिॲक अरेस्ट होण्याचे प्रकार हे वयोवृद्ध आणि अधिक आजारी व्यक्तींच्या बाबतीत जास्त प्रमाणात जाणवतात हेही खरे आहे. मात्र अशा घटना तुलनेने तरुण व्यक्तींच्या बाबतीतही घडू शकतात. थकल्यावर धाप लागणे किंवा छातीत जड जड वाटणे, खूप जास्त व लवकर थकून जाणे, थकल्यावर दरदरून घाम येणे आणि चक्कर आल्यासारखे वाटणे ही त्याची काही लक्षणे आहेत, जी काही आठवड्यांपासून, दिवसांपासून किंवा तासांपासून वाढत आहेत असे जाणवल्यास ती ब्लॉकेजेसची स्थिती बिकट होत चालल्याची खूण असते व त्यातून येऊ घातलेल्या प्रसंगाची पूर्वसूचना मिळू शकते. मात्र काहीवेळा ही घटना धोक्याची कोणतीही सूचना न देता घडू शकते. झोपेमध्ये कार्डिॲक अरेस्टची घटना सर्वसाधारणपणे हृदय कमकुवत असलेल्या लोकांच्या बाबतीत घडते आणि त्यांनाही नजरेसमोर अंधारी येणे किंवा हृदयाची धडधड वाढण्यासारख्या धोक्याच्या सूचना मिळालेल्या असू शकतात. आजाराने गंभीर रूप धारण करणे टाळण्यासाठी किंवा अत्यंत वाईट स्थितीमध्ये मृत्यू टाळण्यासाठी तत्काळ वैद्यकीय उपचार मिळावेत यासाठी वेळच्यावेळी स्क्रिनिंग करणे आणि तत्काळ वैद्यकीय मदत मिळविण्यासारखी आवश्यक पावले आपणहून उचलणे सर्वोत्तम ठरते, कारण अशी लक्षणे आणि मृत्यू या दोन्ही गोष्टी टाळण्यासारख्या आहेत.

## राज्य सरकारचा...

पान १ वरून >>
विभाग)
१४. केंद्राच्या मिठागराच्या जमिनी राज्य शासनाकडे हस्तांतरित करणार. दुर्बलांसाठी घरांच्या योजनांना वेग येणार. (गृहनिर्माण विभाग) १५. पालघर जिल्ह्यातील मुरबे येथे बहुउद्देशीय बंदर प्रकल्प जेएसडब्ल्यू इन्फ्रास्ट्रक्चर विकासक. (बंदरे विभाग) १६. धारावीतल्या अपात्र झोपडीधारकांसाठी परवडणारी भाडेतत्त्वावरील घरे योजना. धारावी पुनर्वसन प्रकल्पावर जबाबदारी. (गृहनिर्माण विभाग) १७. सेवानिवृत्ती उपदान, मृत्यू उपदानाची मर्यादा वाढवून २० लाख. (वित्त विभाग) १८. अनुसूचित जाती, नवबौद्ध शेतकऱ्यांसाठी कृषी स्वावलंबन योजनेचे आर्थिक निकष वाढवले अधिकाधिक शेतकऱ्यांना लाभ होणार. (कृषी विभाग) १९. सोनार समाजासाठी संत नरहरी महाराज आर्थिक विकास महामंडळ. (इतर मागास बहुजन कल्याण) २०. जामखेडच्या पुण्य श्लोक अहिल्यादेवी होळकर सूत गिरणीला अर्थसहाय्य करणार. (इतर मागास बहुजन कल्याण) २१. राज्यातील होमगार्डांच्या भत्त्यात भरीव वाढ. सुमारे ४० हजार होमगार्डना लाभ. (गृह विभाग) २२. नाशिकचे वैद्यकीय पदवी महाविद्यालय व रुग्णालय शासनाच्या अखत्यारीत घेणार. (वैद्यकीय शिक्षण)
२३. आयुर्वेद, युनानी महाविद्यालयातील पदभरतीसाठी निवड समिती. (वैद्यकीय शिक्षण) २४. राज्यातील आणखी २६ आयटीआय संस्थांचे नामकरण. (कौशल्य विकास) २५. आर्य वैश्य समाजासाठी श्री वासवी कन्यका आर्थिक विकास महामंडळ. (नियोजन विभाग) २६. श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर समितीवरील सदस्यांची संख्या वाढवून १५ केली. (विधी व न्याय विभाग) २७. अधिसंख्य कर्मचाऱ्यांचा एक दिवसाचा तांत्रिक खंड क्षमापित. (सामान्य प्रशासन विभाग) २८. बार्टीच्या धरतीवर वनार्टी स्वायत्त संस्था. (इतर मागास बहुजन कल्याण) २९. मेट्रो तीन प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी मुद्रांक शुल्कात सवलत. (महसूल विभाग) ३०. जिल्हा परिषदेतील २००५ नंतर रुजू कर्मचाऱ्यांना एक वेळ पर्याय. (ग्रामविकास विभाग) ३१. पंचगंगा नदी प्रदूषणासाठी सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प अद्यावत करणार. (उद्योग विभाग) ३२. राज्यात विशेष शिक्षक पदाची निर्मिती. ४८६० पदे. (शालेय शिक्षण) ३३. शासन हमी शुल्काचा दर कमी करण्याचा निर्णय. हमी शुल्क माफी मिळणार नाही. (वित्त विभाग) ३४. अवयवदान व अवयव प्रत्यारोपणासाठी यंत्रणा. जनजागृतीवर भर. (वैद्यकीय शिक्षण विभाग) ३५. माजी न्यायमूर्ती संदीप शिंदे समितीचा दुसरा तिसरा अहवाल स्वीकारला. (सामान्य प्रशासन विभाग) ३६. राज्यातील सैनिकी शाळांसाठी आता सुधारित धोरण. (शालेय शिक्षण) ३७. डाळिंब, सीताफळ इस्टेट उभारणार उत्पादकांना मोठा लाभ. (कृषी विभाग) ३८. महसुली उत्पन्न वाढवण्यासाठी मुद्रांक अधिनियमात सुधारणा. (महसूल विभाग)

## अंगणवाडी सेविकांच्या...

पान १ वरून >>
ते अकाऊंट सिल होणार
दरम्यान, लाडकी बहीण योजनेचे पैसे पुरुषांच्या खात्यात जमा झाल्याचे उघडकीस आले आहे. याबाबत आदिती तटकरे म्हणाल्या की, काल प्रशासनाच्या दृष्टीस ही बाब आली. मी स्थानिक जिल्हाधिकाऱ्यांच्या संपर्कात आहे. जे ३७, ३८ अकाऊंट आहेत, ते सिल करण्यात यावे, जे फॉर्म भरण्यात आले ते देखील क्रॉस व्हेरिफाय करण्यात यावे, जेणेकरून कोणावर अन्याय होणार नाही असे आदेश देण्यात आले आहेत, असे त्यांनी सांगितले. आतापर्यंत १ कोटी ८७ लाख महिलांच्या खात्यात लाडकी बहीण योजनेचे पैसे जमा होता आहेत. ज्यांचे फॉर्म काही कारणास्तव मागे राहिले होते, त्यांना तिन्ही महिन्यांचे पैसे आणि ज्यांना आधी २ महिन्यांचे मिळाले त्यांना या महिन्याचे पैसे मिळतील, असे माहिती त्यांनी यावेळी दिली.

## कल्याण कृषी उत्पन्न बाजार...

पान १ वरून >>
कोटींच्या ठेवी शिवाय दहा कोटींच्या उत्पन्नातील वाढ तसेच ६८ कोटींची मालमत्ता व बँक गुंतवणूक सुरक्षित असल्याचे त्यांनी सांगितले अधिनियमाप्रमाणे घसारा तीन कोटीच्या पुढे आकारण्यात आल्याने दिसत असलेली तूट त्याच कारणाने दिसत असल्याची ग्वाही त्यांनी दिली.
महापालिकेकडून सुप्रीम कोर्टाच्या आदेशाची अंमल बजावणी न झाल्याने गेली अनेक वर्ष फुल बाजार प्रकल्प रखडलेला आहे. बाजार समितीच्या कार्यक्षेत्रामध्ये महापालिकेच्या नावे जागा नसताही जागे संदर्भात महापालिकेकडून वाद निर्माण केला जात आहे. नव्याने सादर केलेले प्रारूप आराखडे अद्याप महापालिकेने मंजूर केलेले नाहीत त्यांना विना मोबदला फुल बाजारातील ३५० गाळे शिवाय आतापर्यंत आकारलेली ८० लाखाची थकीत मालमत्ता करायची आकारणी ची मागणी व फुल बाजार उभारणीमध्ये महापालिका व बाजार समितीच्या संयुक्त नावाने उभारणी बाबतचा प्रस्ताव मान्य करण्याच्या अटी महापालिकेकडून टाकण्यात आलेल्या आहेत त्या अटी मान्य नसल्याने तिसऱ्यांदा सर्वोच्च न्यायाल यामध्ये महापालिकाच्या ह्या प्रवृत्ती विरोधात दाद मागण्यात येणार आहे. महापालिकेला दरवर्षी गेली ३०-३५ वर्षे ८० लाखापर्यंतच्या मालमत्ता करण्याचा भरणा केला असता ही एकदाही त्यांच्याकडून कोणतीही नागरी सुविधा दिली जात नसल्याची खंत ही त्यांनी व्यक्त केली विशेष म्हणजे बाजार समितीच्या जागे संदर्भाचा मूळ मालकासोबत न्यायालयीन लढा सामंजस्याने सोडविल्याने कार्यक्षेत्रातील क्षेत्रामध्ये दोन एकर पदांची वाढ झालेली आहे. प्रमोद हिंदुराव यांनी यावेळी केलेला प्रयत्नामुळे ठाणे ते अडीचशे एकर जमिनीवर अध्ययवत कृषी उत्पन्न बाजार समिती उभी राहण्यास शासनाने मंजुरी दिल्याचे सांगितले कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीने कार्य विस्तार करण्याबाबत विचार करताना जी शासनातर्फे मदत लागेल ती मिळवून देण्यास मी मदत करण्याची ग्वाही त्यांनी दिली. आभार प्रदर्शन व राष्ट्रगीता नंतर स्नेहभोजनाने सभा संपन्न झाली.

## पत्रकार अशोक कांबळे यांना मातृशोक



कल्याण : कल्याण मधील पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते अशोक कांबळे यांच्या मातोश्री संपदा नामदेव कांबळे यांचे अल्पशा आजाराने रविवारी रात्री वयाच्या ७३ वर्षी निधन झाले. सोमवारी सकाळी त्यांच्या देहावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी समाजातील सर्वच स्तरातील मान्यवरासह सर्वसामान्यांनी अंत्ययात्रेत सहभाग घेत उपस्थित राहिले होते. त्यांच्या पश्चात पती, तीन मुले, एक मुलगी, जावई, सुना, नातवंडे असा मोठा परिवार असून मंगळवारी सकाळी अस्थीविसर्जन विधी दुर्गाडी गणेश घाट येथे होणार असून दोन ऑक्टोबर रोजी सकाळी जलदान विधी हा राहत्या घरी संपन्न होणार आहे. संपदा कांबळे यांनी आपल्या कुटुंबाचा गाडा मोठ्या कष्टाने सावरत त्यांनी समाजातील गरजूना मदतीचा हात देत सामाजिक बांधलिकाचा वसा त्यांनी चालविला होता. त्यामुळे त्यांच्या या निधनाने समाजातील सर्वच वर्गातून हळहळ व्यक्त होत आहे.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दौऱ्याच्या पूर्वतयारीसाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक संपन्न

ठाणे : ठाणे शहरात कासारवडवली येथील वालावलकर मैदान येथे होणाऱ्या मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियान कार्यक्रमप्रसंगी पंतप्रधान नरेंद्र मोदी शनिवार, दि.५ ऑक्टोबर २०२४ रोजी उपस्थित राहणार आहेत. पंतप्रधान यांच्या या दौऱ्याचे नियोजन करण्यासाठी पूर्वतयारीची बैठक आज सोमवार, दि.३० सप्टेंबर रोजी ठाणे महापालिका मुख्यालय येथे झाली.

सुमारे ४० हजार नागरिकांची उपस्थिती या कार्यक्रमास अपेक्षित असून ठाणे तसेच आसपासच्या महापालिकां मधून सुमारे १२०० बसगाड्यांची ये-जा घोडबंदर रोड परिसरात होणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा हा नियोजित दौरा शनिवार, ५ ऑक्टोबर २०२४ रोजी होणार आहे. या दौऱ्यासाठी आवश्यक सर्व व्यवस्थांचे नियोजन करण्यासाठी विविध जबाबदाऱ्यांची निश्चिती करण्यात आली आहे. त्यानुसार, पूर्वतयारीचा आढावा घेण्यासाठी ठाणे महापालिका मुख्यालय येथे बैठक झाली. या बैठकीस, महापालिका आयुक्त सौरभ राव,



जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, महाराष्ट्र मेट्रो रेल महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर, एमएमआरडीएचे अतिरिक्त महानगर आयुक्त अश्विन मुदगल, अपर जिल्हाधिकारी मनिषा जायभाये-धुळे, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. संदीप माने, गणेश देशमुख, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, नगर अभियंता प्रशांत सोनाग्रा, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता सिद्धार्थ तांबे, उपनगर अभियंता शुभांगी केसवानी, पोलीस उपायुक्त अमरसिंह जाधव, उपायुक्त (मुख्यालय) जी. जी. गोदेपुरे, उपायुक्त (समाजविकास) अनघा कदम, उपायुक्त (आरोग्य) उमेश बिरारी, पोलीस उपायुक्त (वाहतूक) पंकज शिरसाट, जिल्हा नियोजन अधिकारी वैभव कुलकर्णी, उपजिल्हाधिकारी विकास गजरे, ठाणे प्रांताधिकारी उर्मिला पाटील, एमएमआरडीए, महामेट्रो अशा विविध महत्त्वाच्या विभाग/कार्याल यांचे वरिष्ठ अधिकारी या बैठकीस उपस्थित होते. पावसाळ्याचे दिवस लक्षात घेवून मुख्य सभामंडप, पार्किंग व्यवस्था येथील सर्व नियोजन करण्यात यावे. त्याचबरोबर वीज पुरवठा, इंटरनेट सेवा यांची पर्यायी व्यवस्थाही उपलब्ध करण्यात यावी, अशा सूचना जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी यावेळी दिल्या. तसेच, या काळात मोठ्या प्रमाणावर वाहतूक होणार असल्याने वाहतुकीसाठी बंद होणारे रस्ते, सेवा रस्त्यांच्या वापराची स्थिती आदींबाबत नागरिकांना अवगत करण्यात यावे, असे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी सांगितले. मुख्य सभामंडप, हेलिपॅड, गाड्या आणि बसेस पार्किंग व्यवस्था, वीज पुरवठा, सीसीटीव्ही नेटवर्क, जोड रस्ते यांच्या सद्यःस्थितीचा आढावा या बैठकीत घेण्यात आला. बसगाड्यांची पार्किंग व्यवस्था, अतिमहत्त्वाच्या व्यक्तीचे प्रवास मार्ग आदींबाबत या बैठकीत पोलीस उपायुक्त (वाहतूक) पंकज शिरसाट यांनी सादरीकरण केले. सुमारे १२०० बसगाड्यांच्या पार्किंगचे नियोजन महापालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने केले आहे. त्या जागा ताब्यात घेण्यात आल्या असून त्यांचे सपाटीकरण आदी कामे करण्यात येत असल्याची माहिती नगर अभियंता प्रशांत सोनाग्रा यांनी दिली. तर, मुख्य सभामंडप आणि हेलिपॅड यांच्या व्यवस्थेबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता सिद्धार्थ तांबे यांनी माहिती दिली. या बैठकीनंतर उपस्थित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष कार्यक्रमस्थळाचीही एकत्रित पाहणी केली.

# मांगरूळ बुद्धविहारात वर्षावासाचे अकरावे धम्म प्रवचन

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता/ (प्रतिनिधी) –**

बोरघर : शनिवार दिनांक २१/९/२०२४ रोजी पंचशील बौद्धजन सेवासंघ गोरेगाव विभाग, बौद्धजन पंचायत समिती गोरेगाव शाखा क्र. ८४१ /१ते ५ पंचशील महिला संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयु. विकास दादा गायकवाड ( डॉ बाबासाहेब आंबेडकर तंत्र शास्त्र विद्यापीठ लोणेरे माणगाव चे मा. कुलसचिव, सामाजिक कार्यकर्ते, समाज धुरीण लोक नेते ) यांच्या अध्यक्षते खाली वर्षावास धम्म प्रवचन मालिकेचे अकरावे पुष्प मांगरूळ बौद्धजन सेवा संघ स्थानिक व मुंबई (रजि) व रमाई महिला मंडळ स्थानिक यांच्या वतीने गुंफताना व्याख्याते, प्रबोधनकार वसंतराव नाईक महाविद्यालय म्हसळा येथील अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा. कानिफ भोसले सर यांनी विज्ञानवादी डॉ. बाबासाहेब आंबेडकर या विषयावर



प्रबोधनपर बोलताना म्हणाले की, जगातील पहिले आणि शेवटचे मानसशास्त्रज्ञ जर कोणी असेल तर ते आहेत तथागत भगवान गौतम बुद्ध, तथागतांचे तीन टप्पे सांगताना समजून घेणारे सिद्धार्थ गौतम हा एक टप्पा , त्यानंतर ज्ञानप्राप्ती झालेले म्हणजे सत्य उमजलेले सम्यक संबुद्ध हा दुसरा टप्पा व त्यानंतर वैरागी बुद्ध असे विविध टप्प्यातील बुद्ध सांगताना नेमके आधुनिक काळातील बुद्ध कोण हे सांगताना प्रा.भोसले सर पुढे म्हणतात कि ,२९ व्या वर्षी सत्य शोधणारे सिद्धार्थ गौतम तर ऐन तारुण्यात वीस - बावीस वर्षाचे भिमराव ५८ संस्थानांचा विरोध असताना व्हिक्टोरीया राणी च्या पुढे भारतातील लोकशाही मुल्ये रुजविण्यासाठी चा जाहीरनामा

### विज्ञानवादी बाबासाहेब हेच आधुनिक भारतातील खरे बुद्ध
**- प्रबोधनकार प्रा. कानिफ भोसले**

सादर करतात. अशी अनेक उदाहरणे देऊन बाबसाहेबांच्या राजकीय सामाजिक कायदेशीर कार्याचा धावता आढावा सांगून अतिशय मौल्यवान माहिती प्रबोधनकार प्राध्यापक कानिफ भोसले सरांनी उपस्थितीत धम्म उपासक आणि उपासिकांना दिली.

सदर कार्यक्रमाच्या अल्पोपाहाराची व्यवस्था समाजातील दानशूर धम्म उपासक आयु. प्रमोद लोखंडे यांनी केली. सदर वर्षावास धम्म प्रवचन मालिका कार्यक्रमाचे सुत्रसंचलन आयु. निखिल लोखंडे यांनी केले.

सदर वर्षावास धम्म प्रवचन मालिका कार्यक्रमला अध्यक्ष विकास दादा गायकवाड , सचिव संदिप साळवी सर , डॉ.दिलीप साळवी सर ,रामदास जाधव बळीराम हाटे ,शाखा क्र २ चे कोषाध्यक्ष राजू मोरे सर , शाखा क्र ३ चे सचिव विजय जाधव ,१ चे अध्यक्ष प्रकाश जाधव पंचशिल महिला संघाच्या अध्यक्षा सुप्रियाताई साळवी, सचिवा संघमित्रा गायकवाड, रेश्मा साळवी, अस्मिताताई जाधव, जाधव, नंदा मोरे वडगाव, उषाताई हाटे नागाव महिला संघ व मंदा मोरे कुरवडे महिला गोरेगाव विभागातील विविध गावातून उपासक उपासिका बहुसंख्येने उपस्थित होते.जेष्ठ सभासद व माजी अध्यक्ष आयु.विश्राम लोखंडे, सामाजिक कार्यकर्ते व माजी सचिव आयु.तुकाराम लोखंडे, माजी उपाध्यक्ष आयु.अनंत लोखंडे, मुंबई सचिव आणि पं.बौ.से.संघ विश्वस्त आयु.संतोष लोखंडे, शाखा क्र.१८० मुंबई उपसचिव आयु.प्रविण लोखंडे, उपाध्यक्ष आयु.पांडूरंग लोखंडे, जेष्ठ सभासद आयु. शिद्धार्थ लोखंडे,प्रकाश लोखंडे, मुंबई सक्रिय सभासद आयु.महेंद्र लोखंडे, दानशुर व सक्रिय सहभाग आयु.प्रमोद लोखंडे,बाविस प्रतिज्ञा अभियंता चे कार्यकर्ते आयु.दिनेश लोखंडे, स्थानिक सचिव निखिल लोखंडे, पंकेश लोखंडे,राहुल लोखंडे,राजेंद्र लोखंडे, रितेश लोखंडे, पार्थ लोखंडे, मांगरुळ ग्रामपंचायत सदस्य सौ.अपर्णा लोखंडे, कल्पना लोखंडे, सुवर्णा लोखंडे, रोहिता लोखंडे, प्रफुल्ला लोखंडे, रंजना लोखंडे, मंगला लोखंडे, ऋतिका लोखंडे, विशाखा लोखंडे, रश्मी लोखंडे, सविता अ.लोखंडे, सविता ग. लोखंडे, उज्वला लोखंडे, सोनाली लोखंडे, आकाक्षा लोखंडे,प्रज्ञा लोखंडे इत्यादी उपासक उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## मुंबई-पुण्यासाठी भारतातील...

पान १ वरून >> लागून असलेली एक गल्ली पावसाळ्यात बंद करावी लागते. अपघातांचे प्रमाण कमी करणे आणि वाहने वर्षभर कोणत्याही त्रासाशिवाय धावू शकतील याची काळजी घेण्याची गरज लक्षात घेऊन मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील खोपोली एक्झिट ते कुसगाव दरम्यान १३.३ किमी लांबीचा मिसिंग लिंक तयार करण्यात येत आहे.
**ताशी २५० किमी वेगाने वाहणारे वारे देखील ते हलवू शकणार नाहीत** - खोपोली येथे बांधण्यात येत असलेला देशातील सर्वात उंच केबल पूल ताशी २५० किमी वाऱ्याचा वेग सहन करू शकतो. ब्रिज कन्स्ट्रक्शन कंपनी अफकॉन्सचे व्यवस्थापकीय संचालक एस. परमशिवन यांच्या म्हणण्यानुसार, ज्या कॉम्प्लेक्समध्ये हा पूल बांधला जात आहे, तेथे साधारणपणे २५ ते ३० किमी प्रतितास आणि जास्तीत जास्त ५० किमी वेगाने वारे वाहत असतात.
**गाड्या १०० किमी वेगाने धावतील** - या पुलावरून १०० किमी वेगाने वाहने धावतील. या कारणास्तव, जोरदार वारे लक्षात घेऊन पुलाची रचना करण्यात आली आहे. परदेशात डिझाइनची चाचणी झाल्यानंतरच ते स्वीकारण्यात आले आहे. जास्त उंची आणि जोराचा वारा लक्षात घेऊन २५० किमी वेगाने वारा वाहू लागला तरी पुलाला काहीही होणार नाही, अशी रचना तयार करण्यात आली आहे.
**पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण-**
सुमारे ८५० मीटर लांब आणि २६ मीटर रुंद असे दोन केबल पूल दोन टप्प्यात बांधले जात आहेत. पुलाच्या पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण झाले आहे, तर दुसऱ्या टप्प्याचे काम सुरू आहे. मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरून येणाऱ्या गाड्या डोंगरात बांधलेल्या बोगद्यातून मिसिंग लिंकमध्ये प्रवेश करतील. बोगद्यातून बाहेर पडल्यानंतर १८३ मीटर उंच पुलावरून वाहने दुसऱ्या डोंगरात बांधलेल्या बोगद्यापर्यंत पोहोचतील. एस. परमशिवन यांनी दिलेल्या माहितीनुसार,पुलाच्या बांधकामात सुमारे ३१ हजार टन स्टीलचा वापर
केला जाणार आहे. आणि ३.५ लाख घनमीटर काँक्रीट वापरण्यात येणार आहे. पुलाचे वय सुमारे १०० वर्षे आहे.

## ठाण्याच्या विकासासाठी...

पान १ वरून >> एकूण १ हजार ३५४ कोटी ६६ लाख रुपये बिनव्याजी दुय्यम कर्ज म्हणून उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात आली.

**ठाणे वर्तुळाकार मेट्रो रेल्वे प्रकल्प**
ठाणे वर्तुळाकार मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या कामास गती देण्यात येत असून, त्यासाठी आवश्यक १२ हजार २२० कोटी १० लाख रुपयांच्या सुधारित आराखड्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. या मेट्रो रेल्वे मार्गाची लांबी २९ किलोमीटर्स असून, २० उन्नत स्थानके व २ भूमिगत स्थानके आहेत.
**ठाणे ते बोरीवली भुयारी मार्ग** - ठाणे ते बोरीवली या भुयारी मार्गासाठी १८ हजार ८०० कोटी ४० लाख रुपयांच्या प्रकल्पास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या या सहा पदरी मार्गाच्या दुहेरी-भुयारी मार्गाचे बांधकाम प्रतिपदरी भुयारी मार्गाची एकूण ११.८५ किमी अशी असून, एकूण १८ हजार ८३८ कोटी ४० लाख अशा किंमतीच्या प्रकल्पाची एमएमआरडीए मार्फत अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात आली.
**रमाबाई आंबेडकर नगर, कामराजनगरच्या एसआरएला गती देणार** - रमाबाई आंबेडकर नगर, कामराजनगरच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेला गती देण्यासाठी एमएमआरडीएला जमीन अधिमूल्य भरण्यास सवलत देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.
कुर्ला येथील १४ हेक्टर जमिनीची रेडिरेकनर नुसार २५ टक्के जमीन अधिमूल्याची रक्कम सुरवातीला न घेता प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर विक्री करून मिळणाऱ्या रकमेतून हे अधिमूल्य भरण्याची सवलत एमएमआरडीएला देण्यात येईल.

# जिल्हा क्रीडा संकुलाचे पालकमंत्री रविंद्र चव्हाण यांच्या हस्ते भूमिपूजन

पालघर : राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाचे उत्कृष्ट खेळाडू घडविण्यासाठी राज्य शासनाचे जिल्हा क्रीडा संकुल मुख्य भूमिका बजावेल असा विश्वास सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम वगळून) तथा पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री रविंद्र चव्हाण यांनी व्यक्त केला.पालघर जिल्हा क्रीडा संकुलाचे भूमिपूजन टेंभोडे येथे पालकमंत्री रविंद्र चव्हाण यांच्या हस्ते झाले. त्यावेळी श्री. चव्हाण बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष प्रकाश निकम, माजी खासदार राजेंद्र गावित, जिल्हाधिकारी गोविंद बोडके, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे, जिल्हा पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, जिल्हा क्रीडा अधिकारी सुहास




व्हनमाने तसेच खेळाडू आणि विद्यार्थी उपस्थित होते.
खेळाला विशेष प्राधान्य देण्यासाठी केंद्र आणि राज्य शासन विशेष प्रयत्न करत असून खेलो इंडियाच्या माध्यमातून क्रीडा क्षेत्राला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. पालघर जिल्ह्यातील तरुणांना क्रीडा क्षेत्राचे विशेष आकर्षण असल्यामुळे जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी जिल्ह्यामध्ये क्रीडा संकुल व्हावे अशी मागणी केली होती. त्यांच्या मागणीचा सकारात्मक विचार करून क्रीडा संकुलाचे आज भूमिपूजन करण्यात आले आहे. विविध क्रीडा प्रकाराचे प्रशिक्षण एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहे. खेळाडूंना विविध सुविधा पुरवण्यासाठी क्रीडा क्षेत्रामध्ये उद्योजक, नागरिक तसेच स्वयंसेवी संस्था यांनी योगदान दयावे. असे अवाहनही पालकमंत्री रविंद्र चव्हाण यांनी केले.

## महाराष्ट्रातील देशी गाय...

पान १ वरून >> निर्णय घेण्यात आला असल्याचे शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे. या योजनेची अंमलबजावणी ऑन लाइन पद्धतीने केली जाणार आहे. या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात गोशाळा पडताळणी समिती असेल.

**देशी गायीच्या दुधाचे महत्व**
देशी गायीच्या दुधामध्ये ए२ प्रोटिन असल्याने शरीरासाठी चांगले मानले जाते. गायीच्या दुधात शरीर पोषणासाठी महत्वाचे अन्नघटक उपलब्ध असल्याने गायीचे दूध हे पूर्णअन्न मानले जाते. देशी गायीच्या दुधाचे मानवी आहारातील महत्व, आयुर्वेद चिकित्सा पद्धतीत पंचगव्याचा पावर तसेच सेंद्रिय शेती पद्धतीत गायीचे शेण व मूत्राचे महत्व विचारात घेता देशी गायीच्या संख्येत होणारी घट ही चिंताजनक बाब ठरत आहे. त्यामुळे देशी गायीला राज्यात राजमाता गोमाता असा दर्जा देण्यात आला आहे.
महाराष्ट्रातील देशी गायींच्या प्रमुख ५ जाती
डांगी- या जातीच्या गायी प्रामुख्याने नाशिक आणि अहमदनगर जिल्ह्यांमध्ये आढळतात.
देवणी - या जातीच्या गायी महाराष्ट्रात प्रामुख्याने लातूर, नांदेड आणि उस्मानाबाद जिल्ह्यात आढळतात
लाल कंधार - नांदेड आणि लातूर जिल्ह्यात आढळते.
खिल्लार - या जातीच्या गायी सोलापूर, सातारा, पुणे आणि कोल्हापूर जिल्ह्यात आढळतात.
गवळावू - या जातीच्या गायी प्रामुख्याने नागपूर आणि वर्धा जिल्ह्यात आढळतात.

‘ठाणे जीवनदीप वार्ता’ हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री. रविंद्र नारायण घोडविंदे तथा कार्यकारी संपादक विजय गोविंद यादव यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले. (या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९१५८०७८६०१ E Mail – jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी